# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१) ५५१९ (०६-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळांची परिस्थिती अत्यंत दयनिय असून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरुन पोषण आहारातील अनियमितता, अध्यापनातील अनास्था इत्यादी प्रकारामुळे विद्‌यार्थ्यांची गैरसोय होत असून यात गैरप्रकार होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जिल्हा परिषदेच्या प्राथमिक उर्दू शाळांची परिस्थिती सुधारण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्हयातील येवला तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळांत अध्यापनातील अनास्था आढळून आली आहे.

(२), (३) व (४) अध्यापनातील अनास्थेस कारणीभूत असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची १ वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेची झालेली दुरवस्था**

**(२) ५२५२० (१२-०५-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक मुलींच्या शाळेचे संरचनात्मक सर्वेक्षण प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचे मार्फत करण्यात येणे, उक्त शाळेची इमारत सन १९८५ साली बांधण्यात आली असून हे बांधकाम वॉलबेरींगचे असल्याने या इमारतीच्या छताला व भिंतीला गळती लागून इमारत अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचा संबंधित सेवा पुरवठादार मे.पी.बी.म.से. ॲन्ड असोसियटस, नागपूर या संस्थेच्या अभियंत्याने संरचणात्मक सर्वेक्षण अहवालात नमुद केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळेत शिक्षण घेणारे सुमारे ८७२ विद्यार्थी व विद्यार्थीनीचे आणि २५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी धोकादायक स्थितीतील वर्ग खोल्या व शाळा इमारतीत अध्ययन व अध्यापन करीत असल्याने संभाव्य आपात्कालीन परिस्थितीत त्यांच्या सुरक्षेसाठीची कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीची उपाययोजना म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) अंशत खरे आहे.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानातंर्गत मे.पी.टी.मसे. ॲण्ड असोसियटस, नागपूर या संस्थेमार्फत शाळा इमारतींचे प्राथमिक संरचनात्मक सर्वेक्षण करण्यात आले आहे. नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या इ.स.१९६५ साली बांधण्यात आलेली प्राथमिक व माध्यमिक मुलींच्या शाळेची इमारत Load Bearing पध्दतीची आहे. सद्य:स्थितीत शाळा प्रांगणामध्ये एकूण तीन इमारती असून यापैकी माध्यमिक शाळा इमारत मोडकळीस आली आहे.
(२) व (३) जिल्हयातील दुरूस्ती पलीकडे गेलेल्या शाळांमध्ये कोणतीही दुर्घटना होणार नाही याची काळजी घेण्याबाबत तसेच, जिल्हा नियोजन व विकास कार्यक्रम (DPDC) अंतर्गत उपलब्ध निधीमधून सदर धोकादायक माध्यमिक शाळेची इमारत निर्लेखित करून नवीन शाळा इमारत उपलब्ध करण्यासाठी नियोजन करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील जंजिरा जलदुर्गाची झालेली दुरवस्था

**(३) ७४९६० (१४-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील जंजिरा जलदुर्गाची निधी अभावी झालेली दुरवस्था तसेच स्वच्छता व सुरक्षा धोक्यात आल्याने पर्यटकांची संख्याही कमी झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ल्यावरील पितळेच्या गगनभेदी तसेच अन्य तोफा चोरीस जाणे, किल्ल्याच्या २२ बुरूजांपैकी अनेक बुरूज ढासळलेले असणे तसेच तेथील विहीरीची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गड-किल्ले, जलदुर्ग यांच्या संवर्धनासाठी भरीव निधी व उपाययोजना करण्यात आल्याची घोषणा शासनाने केली असली तरी अद्यापही जंजिरा जलदुर्गाच्या कामासाठी उपाययोजना झाली नाही, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून जंजिरा जलदुर्गाच्या संवर्धनासाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) मुरुड (जि.रायगड) येथील जंजिरा किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडल, सायन यांच्या अखत्यारितील आहे. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडल, सायन यांनी कळविल्यानुसार हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तोफ चोरी झाल्या प्रकाराची तक्रार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

किल्ल्याच्या जतन दुरुस्तीची कामे मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकानुसार व प्राप्त झालेल्या निधीतून वेळोवेळी केली जातात असे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडल, सायन यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात जिल्हा परिषदेच्या शाळांकडून बचत गटाला दयावयाची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४) ७७५१९ (१७-०२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात जिल्हा परिषदेच्या शाळांकडून बचत गटाला दयावयाची देयके अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे मागील पाच महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर बचतगटांची देयके तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये निधीअभावी बचत गटांची माहे ऑगस्ट, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीतील देयके उशीराने माहे मार्च, २०१७ मध्ये अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील केंद्र प्रमुख, मुख्याध्यापकांची तसेच उप शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(५) ८६९७७ (२३-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सरळसेवा भरतीतील केंद्र प्रमुख, मुख्याध्यापकांची तसेच उप शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्याने सदर पदे सेवा जेष्ठतेनुसार समायोजन करुन शासनमान्यतेनुसार भरावीत असा प्रस्ताव जिल्हा शिक्षण समितीने जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडे दिनांक १३ मे, २०१७ व तत्पूर्वी अनेक वेळा पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध रिक्तपदे भरण्याबरोबरच १० वर्षापुर्वीच्या जुन्या शाळांच्या इमारती दुरुस्त करण्यासाठी निधी मिळावा अशी मागणी प्रस्तावात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने रिक्त असलेली विविध पदे भरणे व सेवा जेष्ठतेनुसार समायोजन करणे तसेच पडझड झालेल्या २२ शाळांच्या दुरुस्तीबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सिंधुदुर्ग जिल्हयातील केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांची पदे अतिरिक्त आहेत. सद्य:स्थितीत तेथील मुख्याध्यापकांच्या समायोजनास न्यायालयीन स्थगिती आहे. शिक्षकांची रिक्त पदे अतिरिक्त मुख्याध्यापक पदाच्या समायोजनानंतर भरण्यात येतील.

राज्यातील खाजगीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व माध्यमाच्या शाळांमधील शिक्षण सेवक भरती ही अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे करण्याकरिता माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सदर परीक्षा घेण्यात आलेली आहे. "पवित्र" या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सदर भरती प्रक्रीया सुरु करण्यात येत आहे.

जुन्या व तातडीच्या दुरुस्ती करावयाच्या आवश्यक ४५६ शाळांची यादी मागणी अनुदानासह दि.६.११.२०१७ रोजी तसेच ६४५ शाळांच्या दुरुस्तीचा प्रारुप आराखडा तयार करुन दि.१७.११.२०१७ अन्वये जिल्हा नियोजन समिती सिंधुदुर्ग यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. पडझड झालेल्या २२ शाळांच्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि.रायगड) येथील रानसई परिसरातील पाणीटंचाईबाबत**

**(६) ८८३४९ (१८-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील रानसई परिसरातील आदिवासी विभागात एकूण सात पाडे असून या पाडयांपैकी काही ठिकाणी मार्चपासून पाणीटंचाई जाणवू लागली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात प्रामुख्याने दरवर्षी उन्हाळ्यात रानसई धरणाची पातळी खाली जात असल्याने या आदिवासी विभागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत असल्याने शासनाने याबाबत कायमस्वरुपी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०४-२०१८) :** (१) रानसई ग्रामपंचायत अंतर्गत एकूण सहा आदिवासी वाडया असून त्यापैकी काही ठिकाणी मार्चपासून पाणी टंचाई जाणवू लागते हे खरे आहे.
(२) रानसई आदिवासी वाडया करिता सन २००८-०९ मध्ये भारत निर्माण योजने अंतर्गत कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे.

उन्हाळयामध्ये रानसई धरणातील पाण्याची पातळी खाली गेल्यावर योजनेच्या उद्भव विहिरीतील पाणी कमी झाल्यावर पाणी टंचाई काळात आवश्यक तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच संबंधीत सर्व वाडयांमध्ये उपलब्ध असलेल्या विहीरी व हातपंपाव्दारेही पिण्याचा पाण्याचा पुरवठा केला जातो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील समस्यांबाबत**

**(७) ९५३०० (३०-१२-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी व या क्षेत्रांच्या गरजांकडे दुर्लक्ष होत असल्याप्रकरणी साहित्यिक, सांस्कृतिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांचेकडे दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच उक्त समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यापैकी बहुतांश मागण्या हया विविध विभागांशी संबंधीत आहेत. त्यानुसार त्या त्या विभागास कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. या विभागाशी संबंधीत मागण्यांपैकी वृध्द साहित्यिक कलावंतांचे मानधन वाढ व प्रतिवर्षी लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ या महत्वाच्या मागण्या आहेत.

मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार शासन निर्णय क्र. वृकमा २०१३/प्र.क्र.४०/ सां.का.४, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ अन्वये, वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजनेअंतर्गत मानधनामध्ये दीडपटीने वाढ करण्यात आली असून प्रत्येक जिल्हयास प्रतिवर्षी लाभार्थी पात्र ठरविण्यासाठी ६० इतका इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंढेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(८) ९५३९४ (२९-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढेगाव (ता. इगतपुरी जि. नाशिक) येथे गरीब कुटुंबातील आदिवासी मुलींकरिता कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ साली स्थापन झालेल्या या निवासी विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामावंर रुपये ७० लक्ष निधी खर्च करूनदेखील विद्यालयाची इमारत अपूर्णावस्थेत असल्याने विद्यार्थिनींना दरमहा ३० हजार रुपयाच्या भाड्याच्या इमारतीत राहावे लगत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने विद्यालयाच्या इमारतीचे उर्वरित बांधकाम पूर्ण करून आदिवासी गरीब विद्यार्थिनींच्या इमारतीसंबंधी अडचणी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी Emphathy Foundation हया NGO ची मदत घेवून पुढील कामकाज सुरु करण्यात आले असून, सदरचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सांगली जिल्हयातील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना सौरउर्जेवर चालविण्याबाबत**

**(९) ९५७२८ (२९-१२-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना वीज देयकांच्या थकबाकीमुळे खंडीत होऊ नयेत म्हणून सौरउर्जेवर चालविण्याचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे मंजूरीकरिता पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे काय, तसेच प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०५-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सौर उर्जेवर चालविण्याबाबत शासनाचे सध्या कोणतेही धोरण नाही. तथापि, सांगली जिल्हयामधील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सौर ऊर्जेवर चालविणेसाठीचा रु. ३५.०० कोटीचा ढोबळ प्रस्ताव अध्यक्ष, जिल्हा परिषद, सांगली यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सांगली दोऱ्यात दिनांक २५.११.२०१७ रोजी निवेदनाव्दारे सादर केला आहे. तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी सविस्तर प्रस्ताव मेडा (MEDA) कडे तांत्रिक तपासणीसाठी दिनांक २२.१.२०१८ रोजी सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कु.श्वेता बाळासाहेब गोडसे (ता.आटपाडी, जि.सांगली) या विद्यार्थीनीस शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत**

**(१०) ९५८१४ (२९-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कु.श्वेता बाळासाहेब गोडसे (ता.आटपाडी, जि.सांगली) या विद्यार्थीनीस सन २०११ मध्ये पूर्व माध्यमिक व सन २०१४ माध्यमिक शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ तसेच दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, शिक्षण संचालक, पुणे यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कु.श्वेता बाळासाहेब गोडसे हया विद्यार्थीनीला शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०४-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सद्य:स्थितीत संबंधित विद्यार्थीनीच्या बँक खात्याची माहिती क्षेत्रिय स्तरावरुन दि. १०/०२/२०१७ रोजी ऑनलाईन भरण्यात आली असून सदर विद्यार्थीनीच्या बँक खात्यामध्ये ऑगस्ट, २०१७ मध्ये शिष्यवृत्ती जमा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वैदयकीय साधनांच्या किंमतीवर शासनाचे नियंत्रण नसल्याबाबत**

**(११) ९६८७५ (२९-१२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यासह राज्यातील रुग्णालयाकडून हृदय व तत्सम शस्त्रक्रियाकरिता वापरण्यात येणारे स्टेण्ट, कॅथेटर, बलून्स सारख्या वैद्यकीय सामुग्रीसाठी रूग्णांकडून उत्पादन कींमतीपेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याचे व त्यामध्ये पुण्यातील १ मोठे रुग्णालय असल्याचे माहे जुलै,२०१७ मध्ये उघडकीस आल्यानंतरही रुग्णालयांकडून याबाबत दखल घेतली जात नसल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच गायडिंग कँथेटर, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणा-या लेन्स व बलून कॅथेटर, बलून एनसी युफोरिया, गाईड कॅथेटर रनवे ६ एफ, गायडींग कॅथेटर ६ एफ रनवे लेफ्ट बीयू ३, बलून टाझुना, मोझॅक एनसी, बलून क्वाँटम मॅव्हेरिक, स्प्रिंटर लेजंट बलून, व्हिस्टेब्राईट ६ एफ, ईबीयू ३.५ एफ व इतर साधने या साधनांच्या किंमतींवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने रुग्णांची फसवणूक केली जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वैदयकीय साधनांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व निर्धारित किंमतीपेक्षा अधिक किंमतीत सामुग्री विकणा-या हॉस्पीटल विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही. अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) सध्या कार्डीयाक स्टेन्ट व्यतिरीक्त इतर मेडिकल डिव्हायसेसच्या किंमतीवर प्रशासनाचे नियंत्रण नाही. मात्र या साधनांच्या किंमतीवर नियंत्रण नसल्याने रुग्णांना अवास्तव किंमत आकारली जात असल्याचे दिसून येते.
(३) अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या सर्व्हेत वर नमुद बाब निदर्शनास आल्याने मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या लेन्स व काही मेडिकल डिव्हायसेसच्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी औषध नियंत्रक भारत सरकार (DCGI) व केंद्र शासनाच्या राष्ट्रीय औषध मुल्य निर्धारण प्राधिकरण (NPPA) यांना कळविण्यात आले आहे.

उत्पादकांनी निर्धारीत केलेल्या MRP पेक्षा जास्त किंमत आकारणी केल्याचे अन्न व औषध प्रशासनास आढळून आलेले नाही. त्यामुळे कारवाई घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### प्रत्येक जिल्हयात अल्पसंख्याक शिष्यवृत्तीच्या जागांना मान्यता देण्याबाबत

**(१२) ९८०८७ (२९-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक जिल्हयात अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीच्या जागा मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी व अल्पसंख्यांक विद्यार्थी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव (अल्पसंख्याक विकास) प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हयात अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा कोटा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाकडून देण्यात येणाऱ्या प्रि-मॅट्रिक, पोस्ट- मॅट्रिक आणि मेरिट कम मिन्स बेस्ड शिष्यवृत्ती योजना या १००% केंद्र पुरस्कृत योजना आहेत. त्यांचे निकष, अटी, शर्ती व रक्कम केंद्र शासनाकडून निर्धारित केली जाते. या निकषामध्ये बदल करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहे.

---

### बँक खात्यामध्ये शून्य रक्कम असतानाही शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम लाभार्थ्यांना मिळण्याबाबत

**(१३) ९८१०७ (२९-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी शासन नियमानुसार बँकेतील खात्यामध्ये शून्य रक्कम असतानाही पूर्णपणे शिष्यवृत्तीची रक्कम लाभार्थ्यांना प्रत्यार्पित करण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा. अल्पसंख्यांक मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव, (अल्पसंख्याक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) होय, खरे आहे,

(२) नियोजन विभागाच्या दिनांक १५/०२/२०१८ च्या पत्रान्वये राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत प्रस्तुत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश महाव्यवस्थापक राज्यस्तरीय बँकर्स समिती यांना देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्तीच्या निकषांमध्ये बदल करण्याबाबत**

**(१४) ९८१४७ (२९-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक शिष्यवृत्तीसाठी अनुसुचित जमाती शिष्यवृत्ती प्रमाणेच ऑफ लाईन फॉर्म भरण्यात यावेत तसेच शिष्यवृत्तीही ४५% प्रमाणेच करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, लोकप्रतिनिधी व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.अल्पसंख्याक मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव (अल्पसंख्याक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांचेकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्याने केली आहे हे खरे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी असलेली प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही १००% केंद्र पुरस्कृत असून त्यांचे निकष, अटी, शर्ती व रक्कम केंद्र शासनाकडून निर्धारीत

केली जाते. प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीच्या निकषामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मागील वर्षी ५०% गुण असणे बंधनकारक आहे. या निकषामध्ये बदल करण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळावर पदसिद्ध अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्याबाबत**

**(१५) ९८१८६ (२९-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक आयोग मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळावर पदसिद्ध अध्यक्ष व सदस्यांची तसेच हज समितीवर पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली नसल्याने उक्त आयोग, महामंडळ व समितींच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत असून नागरिकांना अत्यंत अडचणीचा सामना करावा लागत असल्याने उपरोक्त पदसिद्ध अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, लोकप्रतिनिधी, अल्पसंख्यांक विद्यार्थी व उद्योजक संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव (अल्पसंख्याक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र राज्य हज समितीवर अध्यक्ष व सदस्य नियुक्तीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई ( जि.बीड ) येथील ऐतिहासिक हत्तीखाना व बाराखंबी लेण्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(१६) ९८६२७ (३०-१२-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील ऐतिहासिक हत्तीखाना व बाराखंबी लेण्यांची दुरवस्था झाली असून त्यांच्या दुरुस्तीकरिता राज्य पुरातत्व विभागाकडे अनेक वेळा लेखी निवेदन व समक्ष भेटून स्थानिक लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून देखील दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हत्तीखाना व बाराखंबी लेण्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने लेण्यांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०४-२०१८) :** (१) नाही, हत्तीखाना लेणी हे राज्य संरक्षित स्मारक असून, त्याची जतन दुरुस्ती २००३-०४ मध्ये करण्यात आलेली आहे. तसेच त्याची दैनंदिन देखभाल पुरातत्व विभागामार्फत करण्यात येते.

संकलेश्वर बाराखांबी मंदीर हे अंबेजोगाई येथील श्री.हनुमंत पोखरकर या शेतकऱ्याने केलेल्या खोदकामात उघड झाल्याचे दि.२५/१/२०१७ च्या महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. तहसिलदार अंबेजोगाई तसेच सहाय्यक संचालक, औरंगाबाद यांनी सदरचे खोदकाम थांबविले असून, खोदकामात उघड झालेली शिल्पे सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे काम पुरातत्व विभागामार्फत करण्यात येत आहे.

(२) व (३) प्रश्न भाग १ च्या उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुराळा (ता.कंधार, जि.नांदेड) गावात पाणी टंचाई असल्याबाबत**

**(१७) ९८६८७ (२९-१२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुराळा (ता.कंधार, जि.नांदेड) या मानार प्रकल्पातंर्गत असलेल्या गावात पाण्याची तीव्र टंचाई असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावाला सदर धरणाव्यतिरिक्त पाण्याचा दुसरा कोणताही स्त्रोत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावाला कायमस्वरुपी सुरळीत पाणी पुरवठा होण्याकरिता लिंबोटी धरण ते कुराळा जलवाहिनी टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०३-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

सद्य:स्थितीत गावास १६ विंधन विहिरीवरील विद्युत पंपा (Power Pump on Borewell) पैकी १२ विंधन विहिरीवरील विद्युत पंपाव्दारे पाणी पुरवठा चालू आहे.

(३) गावास कायमस्वरुपी पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने लिंबोटी धरण ते कुराळा जलवाहिनी टाकण्याबाबत राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१७-१८ च्या मंजूर कृती आराखडयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित असून जिल्हा परिषद मार्फत आवश्यक त्या वितरण व्यवस्थेचे काम हाती घेण्याच्या दृष्टीने सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याच्या सर्वेक्षणाचे काम चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) व लगतच्या ५ ग्रामपंचायतीसाठी अन्न धान्य वितरण अधिकाऱ्याचे स्वतंत्र कार्यालय मंजूर करण्याबाबत

**(१८) ९८८७२ (२९-१२-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपरिषद क्षेत्र व त्यालगतच्या ५ ग्रामपंचायत क्षेत्रासाठी अन्न धान्य वितरण अधिकाऱ्यांचे स्वतंत्र कार्यालय मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, इचलकरंजी यांनी दिनांक २४ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी शहरासाठी १ पुरवठा निरिक्षण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) आणि ३ पुरवठा निरिक्षक (अव्वल कारकुन दर्जा) अशी पदे शहरातील परवान्यांच्या तपासणीसाठी मंजूर असून त्यापैकी पुरवठा निरीक्षण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) हे पद अन्न धान्य वितरण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) म्हणून रूपांतरीत करण्यात यावे, अशीही मागणी उक्त निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-०४-२०१८) :** (१), (२), (३) व (४) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपरिषद क्षेत्र व त्या लगतच्या ५ ग्रामपंचायती या एकत्रित क्षेत्रासाठी अन्न धान्य वितरण अधिका-यांचे स्वतंत्र कार्यालय व त्यासाठी पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या दिनांक २९.६.२०१७ च्या शासन निर्णयानुसार तपासण्यात येत आहे.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील उपहारगृहातील अस्वच्छतेबाबत

**(१९) ९९१९५ (२९-१२-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अनिकेत व आदर्श या दोन्ही उपहारगृहातील अस्वच्छतेमुळे विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ प्रशासन दोन्ही उपहारगृहाकडून अनुक्रमे रुपये.१,५४,००० व रुपये.१,१८,००० इतके भाडे दरमहा घेत असून त्याप्रमाणे विद्यापीठाकडून पायाभूत सुविधा पुरविल्या जात नसणे, तसेच याबाबत विद्यार्थ्यांनी वेळोवेळी विद्यापीठ प्रशासनाकडे तक्रारी करूनही सुधारणा झाली नसल्याचेही खरे आहे काय,

(३ असल्यास, उपहारगृहाचा हॉल अत्यंत छोटा असल्याने बाहेरच टेबल व खुर्ची टाकून बसण्याची व्यवस्था केली असणे तसेच अशुद्ध पाणी, वारंवार ड्रेनेज लाईन खराब होऊन सांडपाणी रस्त्यावर येणे अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना नाश्ता व जेवण करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा विचार करता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०४-२०१८) :** (१) होय.

(२) (३) व (४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार अनिकेत व आदर्श ही दोन्ही कॅन्टीन्स निवीदा प्रक्रियेचा अवलंब करुन चालविण्याकरिता दिलेली आहेत. सदर जागेत विद्यापीठाकडून वीज, पाणी व इतर सर्व पायाभूत सुविधा कोणतेही शुल्क न आकारता पुरविण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ परिसरामध्ये बरीच झाडे असल्यामुळे बाहेरील बाजूस देखील ग्राहकांच्या आवडीनुसार टेबल खुर्च्या मांडून सदर परिसराचा वापर सर्व संबंधितांना बसण्यासाठी करण्यात येतो.

अनिकेत कँटीनच्या परिसरात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी शेड उभारण्यासाठी निवीदा मागविण्यात आल्या आहेत. आदर्श कँटीनच्या परिसरात समोरच मोठे वडाचे झाड असल्याने शेड उभारण्यास मर्यादा आहेत. मात्र विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सोशल सायन्सेस विभागांच्या परिसरामध्ये देखील नव्याने कँटीन उभारण्याचे काम चालू आहे. तसेच विद्यापीठाने नव्याने विधी विभागाच्या इमारतीखाली उपहारगृह सुरु केलेले आहे.

दोन्ही कँटीनच्या परिसरांत विद्यापीठाकढून पेव्हींग ब्लॉक्स बसविण्यात आलेले आहेत. किचनमध्ये नव्याने टाईल्स बसवून देण्यात आलेल्या आहेत. तसेच नव्याने रंगकामही करुन देण्यात आलेले आहे.

अनिकेत कॅटीनजवळील ड्रेनेज लाईन बदलण्यात आलेली आहे. दोन्ही कँटीनला महापालिकेचे प्रक्रीया केलेले पाणीच उपलब्ध करुन दिले जाते. दोन्ही कँटीनकरिता विद्यापीठाने नव्याने अधिकचे कुलर खरेदी केलेले असून ॲक्वा गार्डची वॉटर फिल्टर सिस्टीम नव्याने बसविण्याची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आहे.

विद्यापीठ प्रशासनाकडून सर्व संबंधित घटकांकडून येणाऱ्या सूचनांचा विचार करुन आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामचंद्र लेणी समूह (ता.खेड, जि.पुणे) राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या अधिसूचनेबाबत**

**(२०) ९९२२८ (३०-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामचंद्र लेणी समूह (ता.खेड, जि.पुणे) राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची अंतिम सुधारित अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाने पत्राद्वारे संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र राज्य यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने भामचंद्र लेणी समूह राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे काय वा यासंदर्भात आत्तापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) होय.

(२) सदर स्मारकास राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील गरीब नवाज मायनॉरीटी एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर शाळेचे नाव बदलून अनुदान घेतल्याबाबत**

**(२१) ९९४२९ (२९-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील गरीब नवाज मायनॉरीटी एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर शाळेचे नाव बदलून शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेतल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर संस्थेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, चौकशी करण्यात आली.

(३) संस्थेंने अतिरिक्त रक्कम स्विकारली आहे, सदर प्रदान करण्यात आलेली रक्कम संस्थेंकडून वसुल करण्यात आलेली आहे. सदर संस्था चालकाविरुध्द यथोचित कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**युनायटेड स्पोर्ट्स क्लब, हिंगणा व स्व. श्यामरावजी देशमुख स्मृती विद्यामंदीर संस्थेव्दारा संचालीत शाळांमध्ये झालेल्या नियमबाहय नियुक्त्या**

**(२२) १०१०७५ (२९-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा मतदारसंघातील युनायटेड स्पोर्ट्स क्लब, हिंगणा व स्व. श्यामरावजी देशमुख स्मृती विद्यामंदीर संस्थेव्दारा संचालीत शाळांमध्ये नियमबाहय नियुक्त्यांची चौकशी होणेबाबत विधान परिषद सदस्य, हिंगणा यांनी निवेदनाद्वारे दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी मा.शिक्षण मंत्री यांच्याकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१८) :** (१) (२) व (३) दिनांक १४/०९/२०१७ चे निवेदन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक ०८ जानेवारी २०१८ च्या पत्रान्वये उचित कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

---

**राज्यात शिक्षक भरती बंद असताना शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) घेतल्याबाबत**

**(२३) १०१५६९ (२९-१२-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१२ पासून शिक्षक भरती बंद केल्यानंतर सन २०१३ पासून शिक्षकपदी नियुक्तीसाठी शिक्षक पात्रता परिक्षा (टीईटी) घेतल्याने आतापर्यंत ५९ हजार ११६ उमेदवार परिक्षा पात्र ठरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पदासाठी टीईटी परिक्षातंर्गत उत्तीर्ण असलेल्या पात्र शिक्षक उमेदवाराला सेवेत घेण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, टीईटी पात्र धारक शिक्षक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला सेवेत सामावून घेण्यात आले नसल्यास शिक्षक भरती परिक्षा सन २०१२ पासून बंद असतांना टीईटी परिक्षा घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) शिक्षक पात्रता परीक्षा माहे डिसेंबर, २०१३ पासून घेण्यात येत असून सुमारे ५९८७७ उमेदवार परिक्षा पात्र ठरले आहेत, हे खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दि. २३/०८/२०१३ नुसार शिक्षक पदासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण असण्याची अट शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता म्हणून अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षक पात्रता परीक्षा (TET) प्रत्येक वर्षी आयोजित करणे आवश्यक आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज मधून बीसीएसच्या उत्तरपत्रिका गहाळ झाल्याबाबत

**(२४) १०१८२३ (२९-१२-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विद्यापीठाद्वारे गतवर्षी मार्च-एप्रिल,२०१६ मध्ये झालेल्या विज्ञान विद्याशाखेच्या परिक्षांसाठी फर्ग्युसन कॉलेजकडे मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राची (कॅप सेंटरची) जबाबदारी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचवेळी कॉलेजमधून बीसीएसच्या उत्तरपत्रिका गहाळ झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कॉलेजवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास संबंधितावर अध्यादेश १५७ नुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा खापरी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे स्वच्छ भारत अभियान व रोहयो अंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(२५) १०१८४९ (३०-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा खापरी (ता.घाटंजी,जि.यवतमाळ) येथे स्वच्छ भारत अभियान योजेनेंतर्गत व रोहयोंतर्गत गैरव्यवहार झाला असून अपूर्ण बांधकाम करून लाभार्थ्यांना लाभ दिला असल्याची तक्रार गटविकास अधिकारी, पंचायत समिती घाटंजी यांचेकडे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (११-०५-२०१८) :** (१) होय.

(२) विस्तार अधिकारी, पंचायत समिती, घाटंजी यांनी ५ ग्रामपंचायत सदस्यांसह मौजे खापरी, तालुका घाटंजी, जिल्हा यवतमाळ येथे दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१७ रोजी प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन तपासणी केली असता, शौचालयाचे बांधकाम उत्कृष्ट झाले असून, शौचालयाचे काम पूर्ण झाल्यानंतर व वापर सुरू केल्यानंतर शौचालयाचे प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यात आले आहे. एकंदरीत शौचालय बांधकाम प्रोत्साहनपर अनुदान वाटपात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) येथे अद्ययावत नाट्यगृह उभारणीसाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(२६) १०२५३४ (०१-०१-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे सर्व सोयीयुक्त नाट्यगृह उभारणीसाठी निधी उपलब्ध होण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (चाळीसगाव) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) होय.

(२) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून जिल्हा मुख्यालयाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी नाटयगृह बांधकाम करण्याच्या अनुषंगाने समर्थनासह सुस्पष्ट प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मुद्रणालय असुनही छपाईचे काम बाहेरून करण्यात येत असल्याबाबत**

**(२७) १०२७८६ (२९-१२-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यापीठाचे स्वत:चे मुद्रणालय असून तेथे ७ पूर्णवेळ आणि ११ कंत्राटी असे १८ कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाचे मुद्रणालय असतानाही प्रशासन छपाईचे कामे बाहेरून करून घेत असल्याने मुद्रांनालय तोट्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विद्यापीठ निधींची गैरवापर करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मुद्रणालयात कायमस्वरुपी ७ व ११ कुशल कंत्राटी असे एकूण १८ कर्मचारी आहेत.

(२) हे खरे नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मुद्रणालयात उत्तरपत्रिका वगळता इतर सर्व छपाई कामे होतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील करमाळा व माढा तालुक्यातील अल्पसंख्यांक गावामध्ये समाजमंदीरासह इतर सोयीसुविंधा पुरविण्याबाबत**

**(२८) १०२९७० (२९-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील मौजे जेऊर, पोपळज, बाळेवाडी, कोंढेज, गुळसडी, केम, भाळवणी, देवळाली, (ता.करमाळा) मौजे कव्हे (ता.माढा) या गावातील अल्पसंख्यांक वस्त्यामध्ये समाजमंदीर, इदगाह मैदान व कब्रस्थानासाठी संरक्षण भिंत, आमदार आदर्शगावामध्ये सिमेंट काँक्रिटीकरण इत्यादी विकासकामांसाठी ७० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ फेब्रुवरी, २०१७ रोजी मा.अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१८) :** (१) होय.

(२) होय, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२९) १०२९८० (२९-१२-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभाग शासन निर्णय क्र.ग्राक्षेवि-२०१६/प्र.क्र.५४/का.२, दिनांक ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांना अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात न आल्याने विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, शासनाने जळगांव जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहुल भागातील विकास कामांना तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१८) :** (१) होय.

(२) शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी क्षेत्रिय कार्यालयाला तांत्रिक अडचणीमुळे आहरित करता आला नाही. त्यामुळे सदर निधीचा वापर होऊ शकला नसल्यामुळे सदर कामे प्रलंबित आहेत.

(३) सदर विकासकामांना चालू आर्थिक वर्षा च्या उपलब्धतरतूदी मधून निधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रसिध्द श्रीक्षेत्र माळेगाव (जि.नांदेड) तीर्थश्रेत्रातील पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत**

**(३०) १०३०७५ (०१-०१-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रसिध्द श्रीक्षेत्र माळेगाव (जि.नांदेड) येथील यात्रा महिनाभरावर आली असताना लोहा तालुक्याची तहान भागविणा-या पाणीपुरवठा योजनेची वीज ६० लाखांच्या थकबाकीपोटी वीज खंडीत करण्याची महावितरणाने कार्यवाही केली असल्याने माळेगाव यात्रेत पाणीपुरवठा कमी होणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या श्रीक्षेत्राच्या विकासासाठी मा.मुख्यमंत्री यांनी साडेपाच कोटी रुपयांचा निधी देण्याचे तीन वर्षापूर्वी जाहीर केले होते परंतू अद्याप त्याची पूर्तता केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार श्रीक्षेत्रा माळेगाव येथील पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०३-२०१८) :** (१) होय.

सन २०१५-१६ मध्ये लोहा तालुक्यातील टंचाईग्रस्त ४० गावांना टँकरव्दारे टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा करण्यात आला, त्यासाठीच्या वीज वापरापोटीच्या प्रलंबित देयकासाठी महावितरणने नोव्हेंबर, २०१७ मध्ये वीज पुरवठा खंडीत केला होता.
(२) हे खरे नाही,
(३) माहे डिसेंबर, २०१७ मध्ये रुपये ५.५० लक्ष वीज देयकाचा भरणा करुन योजनेचा पाणी पुरवठा चालु करण्यात आला आहे. तथापि, वीज देयकाच्या थकबाकीची रक्कम जास्त असल्याने ती भरण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांचेकडून टंचाई निधीतून रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ हे माहिती अधिकारांतर्गत माहितीसाठी जादा रक्कम वसूल करीत असल्याबाबत

**(३१) १०४०८६ (०५-०१-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ हे माहिती अधिकारांतर्गत माहिती मागितल्यास नियमानुसार प्रती पृष्ठ दोन रुपये घेण्याऐवजी प्रतीपृष्ठ ४० रुपये वसूल करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विरोधात श्री. एकबाल नजीर अन्सारी, राहणार ८००/५० किल्ला, रविवार वॉर्ड, मालेगांव, जिल्हा नाशिक यानी सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१८) :** (१) अशंत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य पृष्ठ वक्फ मंडळाच्या दि.३१.१.२०१४ च्या आदेशान्वये माहिती अधिकारांतर्गत माहितीसाठी प्रती रु.४०/-

इतकी रक्कम आकारण्यात येत होती. तथापि, दि.०१.०१.२०१७ पासून यात बदल करण्यात आलेला असून आता प्रती पृष्ठ रु.२/- इतकी रक्कम आकारण्यात येत आहे.
(२) होय.
(३) होय. कैंद्रिय माहिती आयोगाने एका प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या आधारे वक्फ मंडळाने सदरचा निर्णय घेतला होता, असे दिसून आल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील शासकीय खरेदी केंद्राकडून मका-ज्वारी खरेदीचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नसल्याबाबत**

**(३२) १०४७५४ (१५-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ तालुक्यातील (जि.जळगाव) शासकीय खरेदी केंद्राकडून १ हजार ४३१ क्विंटल ज्वारी तर १ हजार १० क्विंटल मका माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान खरेदी करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मका-ज्वारी खरेदी करुन २० दिवसांचा कालावधीत उलटून गेल्यानंतरही शेतकऱ्यांना त्याचे पैसे शासनाकडून अद्यापपर्यंत मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने शेतकऱ्यांना पैसे तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत या वर्षापासून ऑनलाईन खरेदी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. शेतक-यांकडून शासकीय खरेदी केंद्रावर भरडधान्याची खरेदी केल्यावर एन.ई.एम.एल. या संस्थेमार्फत शेतक-यांच्या खात्यांवर RTGS द्वारे रक्कम अदा करण्यात येते. भुसावळ, जि.जळगाव येथे खरेदी केलेल्या ज्वारी, मक्याचे शेतकरी चुकारे ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करतांना तांत्रिक चुका झाल्यामुळे उदा. (आयएफसी कोड, जनधन योजनेचे खाते नंबर असणे, बँक खाते नंबर चुक असणे, बंद असलेली बँक खाती नंबर देणे) इत्यादी कारणांमूळे शेतक-यांना मालाचे चुकारे उशिराने मिळाले आहे. सदर तांत्रिक चुकांचे निराकरण करुन खरेदी केलेल्या सर्व शेतक-यांचे मका व ज्वारीची सर्व रक्कम ऑनलाईन पध्दतीने शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चित्रपट क्षेत्रातील कलाकारांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या मानधनाबाबत**

**(३३) १०५६१० (०६-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत राज्यातील चित्रपट क्षेत्रातील कलाकारांना त्यांचे चित्रपटातील भूमिकांच्या दर्जानुसार अ व ब या श्रेणीनुसार मानधन अदा करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक गाजलेल्या मराठी व हिंदी चित्रपटात नायिका व सहनायिकांची भूमिका करण्याऱ्या अभिनेत्री सुरेखा उर्फ ऐश्वर्या राणे यांना एका हिंदी चित्रपटाचे चित्रीकरणादरम्यान झालेल्या अपघातामुळे अपंगत्व येऊन चित्रपटक्षेत्र सोडावे लागल्याने त्यांना राज्य शासनामार्फत रुपये १५०० इतके 'क' श्रेणी कलाकाराचे मानधन माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी व हिंदी चित्रपटात साकारलेल्या नायिकेच्या भूमिकांचा विचार करुन क श्रेणी ऐवजी अ श्रेणीचे मानधन मिळावे म्हणून त्यांनी शासनाकडे माहे मार्च, २०१५ पासून सतत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चित्रपट क्षेत्रातील त्यांचे योगदान व मागणी विचारात घेऊन शासनाने त्यांना अ श्रेणीचे मानधन मंजूर केले असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अभिनेत्री सुरेखा उर्फ ऐश्वर्या राणे या अ श्रेणीच्या मानधनास पात्र असताना त्यांना क श्रेणीचे मानधन मंजूर करण्याची कारणे काय व त्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) त्याचप्रमाणे रुपये २१०० या अ श्रेणीतील मानधनानुसार, माहे मार्च, २०१५ ते जानेवारी, २०१८ या कालावधीतील प्रतिमाह रुपये ६००० या फरकाचे मानधनाची रक्कम त्यांना अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय क्र. वृकमा २०१२/प्र.क्र. ११७/ सां.का.४, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ नुसार महाराष्ट्र राज्यातील वृध्द साहित्यिक व कलावंतांना त्यांच्या श्रेणीनुसार प्रतिमाह "अ" श्रेणीकरिता रुपये २,१००/-, "ब" श्रेणीकरिता रुपये १,८००/- व "क" श्रेणीकरिता रुपये १,५००/- इतके मानधन देण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात कलावंत निवड समितीच्या बैठकीत श्रीमती सुरेखा राणे ऊर्फ ऐश्वर्या राणे यांना संबंधित समितीकडून नजरचुकीने " अ " श्रेणी ऐवजी " क " श्रेणी मंजूर करण्यात आली होती. दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजी मुंबई उपनगर जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत श्रीमती राणे यांना "अ" श्रेणी देण्याबाबत समितीने मंजूरी दिलेली आहे.

(६) श्रीमती राणे यांच्या मानधन श्रेणीतील फरकाची रक्कम प्रतिमाह रुपये ६०००/- नसून रुपये ६००/- आहे. त्यानुसार प्रतिमाह रुपये ६००/- प्रमाणे मार्च २०१५ ते माहे जानेवारी, २०१८ पर्यंत एकूण ३५ महिन्यांचे फरकाची रक्कम रुपये २१,०००/- श्रीमती राणे यांच्या खात्यात दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

---

## धुळे जिल्हयातील कलावंतांचे मानधनासाठीचे प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित असल्याबाबत

**(३४) १०५८२६ (०५-०४-२०१८). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड. यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. भारत भालके (पंढरपूर), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या ३ वर्षात ५५० कलावंतांच्या मुलाखती घेण्यात येऊन १४८ कलावंतांची मानधनासाठी निवड करण्यात येऊन हे प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावांना कधीपर्यंत मंजूरी देण्यात येणार आहे व जिल्हयातील कलावंताचे मानधन कधी सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही. समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांच्याकडून सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या ३ वर्षाची एकूण १४८ नवीन मंजूरी कलावंतांची यादी सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्राप्त झाली. मात्र सदर यादीसोबत मंजूर कलावंतांचे बँकेचे तपशील जोडलेले नसल्यामुळे सदर कलावंतांचे देयक मंजूरीसाठी पाठविता आले नाही.

(२) दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी संबंधित कलावंतांचे बँकेचे तपशील समाज कल्याण कार्यालय, धुळे यांचेमार्फत सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे प्राप्त झाल्यामुळे याबाबतचे

देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आले असून सदर देयक पारीत होताच सदर कलावंतांच्या खात्यावर ऑनलाईन पध्दतीने मानधन जमा करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे गोरेगावच्या (मुंबई) धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत**

**(३५) १०६६५३ (०५-०४-२०१८) : श्री. छगन भुजबळ (येवला):** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे बीओटी तत्वावर गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नवीन पूर्वव्यवहार्यता अहवाल मागवून कार्यवाही करण्याचा दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी मा.मंत्री सांस्कृतिक कार्य विभाग यांनी निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागास हस्तांतरित करण्यासाठी महसूल व वन विभागाने संमती दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत पूर्वव्यवहार्यता अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील पूर्वव्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने नाशिक येथे चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०५-२०१८) :** (१) होय.

(२) नाही.

महसूल व वन विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.

(३) नाही.

(४) पूर्वव्यवहार्यता अहवाल प्राप्त झाला नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडील भात खरेदी "आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत" ऑनलाइन पद्धतीने सुरु करण्याबाबत**

**(३६) १०६७६६ (०४-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१७-२०१८ मध्ये खरीप पणन हंगामासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडील भात खरेदी "आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत" ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय जिल्हा बाजार समितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने तालुकानिहाय किती भात खरेदी केंद्रे तालुका खरेदी-विक्री संघातर्फे सुरू करण्यात आली आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत विकेंद्रित धान खरेदी योजना राज्यात केंद्र शासनामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निदेशास अनुसरुन राबविण्यात येते. सदर धान खरेदी योजनेतर्गत ऑनलाईन पद्धतीने धान खरेदी करण्याचे केंद्र शासनाचे निदेश आहेत. त्यानुसार, शासन निर्णय क्र. खरेदी- १०१७/प्र.क्र. १४०/नापु २९ दि. ०४ ऑक्टोबर २०१७ नुसार संपूर्ण राज्यभर ऑनलाईन पद्धतीने धान खरेदीची योजना राबविण्यात येत आहे.
(२) खरीप पणन हंगाम २०१७-१८ मध्ये जिल्हा मार्केटिंग कार्यालय सिंधुदुर्ग यांचेमार्फत एकूण १७ धान खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेली होती. धान खरेदी केंद्रांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे
सावंतवाडी-७, दोडामार्ग-१, कणकवली-१, वेंगुर्ला-१, कुडाळ-२, वैभववाडी-१ मालवण-३,देवगड-१
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकेतील नावे प्राधान्य यादीत घालण्याचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीबाबत

**(३७) १०७१६४ (१५-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंत्योदय शिधापत्रिकेतील नावांचा प्राधान्य यादीत समावेश करण्याचा शासनाचा निर्णय रद्द करण्याबाबत आजरा, गडहिंग्लज व चंदगड तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्यावतीने निवेदन तहसिलदारांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाला राज्यभरातून विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्यावतीने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

(३) अंत्योदय अन्न योजनेतील ज्या शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील तरतूदीनुसार प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. अशा प्रकारे लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले नसल्याने, सदर निर्णय सद्यस्थितीत रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील धान्य साठवणुकीकरिता गोदामे अपुरी असल्याबाबत**

**(३८) १०८६५७ (०५-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात धान्य साठवणुकीसाठीचे गोदामे ही अपुरी असल्यामुळे तसेच सध्या असलेली गोदामे ही अतिशय दयनीय स्थितीत असल्यामुळे शिधापत्रिका धारकांना निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा केला जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ व माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात नाशिक जिल्हयासाठी सर्वाधिक धान्याचे नियतन उचल केले जात असून साधारणपणे दरमहा २२ हजार मेट्रिक टन धान्याची उचल केली जाते मात्र जिल्हयात उपलब्ध गोदामांची धान्य साठवणुकीची क्षमता १७ हजार मेट्रिक टन इतकीच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास नाशिक जिल्हयामध्ये अपुरी गोदामे असल्यामुळे नविन २१ गोदामे बांधण्याची मागणी पुरवठा विभागाने सन २०१२ मध्ये शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अपु-या गोदामांमुळे धान्याची नासाडी होत असून शिधापत्रिकाधारकांना निकृष्ट धान्यपुरवठा करावा लागत आहे तसेच रेशनच्या धान्याला कीड लागत असल्याने हजारो टन धान्य वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रस्तावांना अदयापही मंजुरी देण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(६) असल्यास सदरहु प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय, असल्यास, नाशिक जिल्हयात जादा धान्य गोदामे बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) नाशिक जिल्हयात दरमहा साधारणपणे २१५०० मे.टन धान्य नियतनाची उचल होते. सदयस्थितीत नाशिक जिल्हयाची उपलब्ध साठवणूक क्षमता १७७५० मे.टन इतकी आहे. नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका-१७ अंतर्गत नाशिक जिल्हयाकडून

प्राप्त प्रस्तावापैकी ८ गोदामांना दि.०५.०८.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी देवळा तालुक्यातील १८०० मे.टन क्षमतेचे गोदाम वापरात आहे.

(६) नाशिक जिल्हयातील नवीन गोदाम बांधकाम प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्याला देण्यात येणारा रॉकेलचा पुरवठा कमी केल्याबाबत**

**(३९) १०९११८ (२०-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला देण्यात येणारा रॉकेलचा पुरवठा केंद्र शासनाच्या उज्वला योजनेअंतर्गत स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची कृत्रीम आकडेवारी दाखवून कमी करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्य रॉकेलमुक्त करण्याची घोषणा शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घोषणेमुळे राज्यातील ५५ हजार हॉकर्स व रिटेलर्स व त्यांच्यावर अवलंबून असणा-या सुमारे ३ लाख लोकावंर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त हॉकर्स व रिटेलर्सच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०५-२०१८) :** (१) प्रधानमंत्री उज्वला योजना केंद्र शासन अंगीकृत असलेल्या तेल कंपन्यांकडून राबविण्यात येते. तेल कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर योजनेअंतर्गत राज्यात दि.२८.०२.२०१८ अखेरपर्यंत १७.८६ लक्ष गॅस जोडण्या वितरीत करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील गॅस जोडण्यांची संख्या विचारात घेऊन केंद्र शासनाकडून राज्यास केरोसिनचा कोटा उपलब्ध करून दिला जातो. केंद्र शासनाने माहे जुलै ते सप्टेंबर, २०१७ या तिमाहीकरीता राज्यास ९८६४० कि.ली. इतका तर माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१७ पासून ९३७०८ कि.ली इतका केरोसिन कोटा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) व (३) राज्य केरोसिन मुक्त करण्याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

(४) केरोसिन हॉकर्स व रिटेलर्स यांची नियुक्ती कमीशन तत्वावर करण्यात आली आहे.शासन निर्णय दि.१४ सप्टेंबर, २०१६ अन्वये किरकोळ/हॉकर्स विक्रेत्यांचे कमीशन रु.२५०/-प्रति कि.ली वरून रू.४५०/-प्रति कि.ली. असे वाढविण्यात आले आहे.

तसेच शासन निर्णय दि.७ सप्टेंबर, २०१७ नुसार केरोसिन विक्रेते व स्वस्त धान्य दुकानातून फ्री सेल केरोसिन व ५ कि.ग्रॅ.चे लहान सिलेंडर विक्री करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात पुरवठा विभागाने गव्हाचे नियतन कमी करुन मक्याचे नियतन करण्याच्या दिलेल्या सूचना**

**(४०) १०९१२१ (०५-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात जिल्हा पुरवठा विभागाने प्रत्येक तालुक्याचे गव्हाचे नियतन कमी करुन त्याएवेजी मक्याचे नियतन करण्याचे कळविले असून अहमदनगर जिल्हयात १६ हजार क्विंटल मक्याचे वितरण स्वस्त धान्य दुकानातून केले जाणार असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गव्हाचे वितरण कमी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत लाभार्थ्यांचे विरोध लक्षात घेता अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक १९ डिसेंबर, २०१७ च्या आदेशाचा पुनर्विचार करुन गव्हाचे वितरण करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०४-२०१८) :** (१) होय.

अहमदनगर जिल्हयामध्ये खरेदी करण्यात आलेल्या २८६०४.५ क्विंटल मक्याचे वाटप माहे जानेवारी, २०१८ ते माहे एप्रिल, २०१८ या कालावधीत करण्यात येत आहे.

(२) व (३) राज्यामध्ये खरेदी करण्यात आलेल्या मक्याचे वाटप त्याप्रमाणात गव्हाचे नियतन कमी करुन प्रतिकिलो १/- या दराने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत करण्याबाबत केंद्र शासनाचे धोरण आहे. त्याअनुषंगाने दिनांक १९ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये मका वाटप करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असल्याने, त्या सुचनांचा पूनर्विचार करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा व पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्राहकांना प्राधान्याने कुटूंब योजनेअंतर्गत समाविष्ट करण्याबाबत**

**(४१) १०९१८५ (०६-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व पवनी तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत अन्न धान्य प्राप्त होणाऱ्या ग्राहकांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ नंतर ज्या ग्राहकांची रेशनकार्ड नव्याने तयार झाली आहेत त्या ग्राहकांना प्राधान्याने अन्न कुटूंब योजनेअंतर्गत समाविष्ट करून धान्य मिळण्यासाठीचे निवेदन दिनांक ०२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राधान्य कुटूंब योजने अंतर्गत सदर ग्राहकांचा समावेश करण्याच्या अनुषंगाने चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ नंतर ज्या ग्राहकांचे रेशनकार्ड तयार आहेत त्या ग्राहकांना प्राधान्य कुटूंब योजनेच्या अनुषंगाने अन्न धान्य पुरवठा करणे शासनाच्या विचाराधिन आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०४-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार सिडींगचे काम सुरु आहे. त्या आधार सिडींगनुसार इष्टांक बदलाची कार्यवाही सुरु असून, सद्यस्थितीत दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंतच्या सर्व शिधापत्रिकाधारकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समावेश करण्याबाबत विचार करण्यात येत आहे. कोणताही पात्र व योग्य लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील थकबाकी देण्याबाबत**

**(४२) १०९२५९ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील थकबाकी रोख स्वरूपात अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ७ वा वेतन आयोग राज्यात लागू होत असतांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी रोख स्वरूपात देण्याची मागणी नागपूर विभागाचे जनप्रतिनिधी यांनी शासनास अनुक्रमे दिनांक १९ सप्टेंबर,२०१७ व दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी जमा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे (जि.पुणे) शहर व ग्रामीण भाग केरोसीनमुक्त करण्याबाबत

**(४३) १०९४६४ (२४-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे (जि.पुणे) शहर व ग्रामीण भाग शंभर टक्के केरोसीनमुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच केरोसीनसाठी पर्यायी इंधन पुरविणेबाबत शासन विचाराधीन आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उक्त निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
माहे एप्रिल, २०१७ पासून पुणे शहर केरोसिन मुक्त करण्यात आलेले आहे. तथापि, ग्रामीण भाग केरोसिनमुक्त करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(२) व (३) शासन निर्णय दि.७ सप्टेंबर, २०१७ नुसार केरोसिन विक्रेते व स्वस्त धान्य दुकानदार यांना स्वस्त धान्य दुकानातून फ्री-सेल केरोसिन व ५ कि.ग्रॅ.चे लहान सिलेंडर वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाकडून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडण्या वितरीत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील दोन स्टुडिओ महामंडळाने रिलायन्स कंपनीला अवैधरित्या हस्तांतरीत केल्याबाबत**

**(४४) १०९६२८ (०६-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथी दादासाहेब फाळके चित्रनगरीतील दोन स्टुडिओ आणि फिल्म प्रयोगशाळा (फिल्म लॅब्रोटरीज), महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने रिलायन्स कंपनीला हस्तांतरीत केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्टुडियो व प्रयोगशाळा कोणत्या निकषाखाली व करारादवारे, कोणत्या दिनांकास महामंडळाने रिलायन्स कंपनीला हस्तांतरीत केले आहेत व त्यादवारे महामंडळास दरमहा प्रमाणे वार्षिक किती रुपये महसूल रिलायन्स कंपनीकडून प्राप्त होत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणात, स्टुडियो व प्रयोग शाळेचे बेकायदा हस्तांतरण झाले असल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार उक्त अवैध हस्तांतरण रद्द करणेबाबत शासनातर्फे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) दादासाहेब फाळके चित्रनगरीने मे.ॲडलॅब फिल्म प्रा.लि. यांना फिल्म प्रोसेसिंग लॅब्रॉटरी उभारण्याकरीता दि.०३.०२.१९९४ रोजीच्या करारनाम्यानुसार ८७०७.५० चौ.मी. जमीन ३३ वर्षाकरीता मे.ॲडलॅब फिल्म प्रा.लि. यांना ३ स्टुडिओ (कलागारे क्र.VII, VIII व IX) निविदे प्रक्रियेद्वारे २० वर्षासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर भाडेपट्टयावर देण्यात आले. सन २००९ मध्ये मे.ॲडलॅब फिल्म प्रा.लि. यांनी कंपनीचे नाव बदलून मे.रिलायन्स मिडिया वर्क्स असे केले आहे. सदर नावात झालेला बदल भारत सरकार कंपनी व्यवहार, मंत्रालय यांनी दि.०५.१०.२००९ रोजी प्रमाणपत्र देऊन प्रमाणित केले आहे.

फिल्म प्रोसेसिंग लॅब्रोटरीच्या करारनाम्यानुसार फिल्म प्रोसेसिंग संबंधित उलाढालीवर ३% महसूल व प्रती वर्ष रु.२ लक्ष भाडे महामंडळास मिळते. कलागारे क्र.VII, VIII व IX चे मंजूर वार्षिक भाडे अनुक्रमे रु.७८,६५,०००/-, रु.९३,०५,०००/- व रु.५६,२८,०००/- असे आहे. सदर वार्षिक भाडयामध्ये ४ ते ८ वर्षासाठी ३% ९ ते १३ वर्षासाठी ४% व १४ ते २० वर्षासाठी ५% अशी वाढ करारनाम्यामध्ये नमूद आहे.

(३) मे.ॲडलॅब प्रा.लि. यांनी कंपनीचे नाव बदलून मे.रिलायन्स मिडिया वर्क्स असे केले असुन बदलास भारत सरकार कंपनी व्यवहार, मंत्रालय यांनी दि.०५.१०.२००९ रोजी मान्यता दिली आहे. कंपनीच्या नावात बदल झाला तरी कंपनीच्या सर्व व्यवहारांसाठी नवीन नावामुळे कंपनीशी पुन: नव्याने करार करण्याची आवश्यकता नाही असे अभिप्राय या महामंडळाच्या कंपनी सेक्रेटरीनी दिलेले आहेत. त्यामुळे चौकशी अथवा कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: नाशिक जिल्हयात केंद्रीय राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम लागू करून पात्र लाभार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करण्याबाबत**

**(४५) १०९७९५ (२४-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयासह संपूर्ण राज्यात केंद्रीय राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ मध्ये वा त्यासुमारास सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय योजनेअंतर्गत नव्याने लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी
दिनांक ३ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हानिहाय सुधारित इष्टांक देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्याची निवड करण्यासाठी सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यादृष्टीने राज्यात सर्व शिधापत्रिकांचे आधार सिडींगचे काम करण्यात येत असून सर्व पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत शहरी भागातील □५९,०००/- व ग्रामीण भागातील रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये सध्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम सुरु असून, सदर काम बहुतांश पूर्ण झालेले आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर अपात्र शिधापत्रिकाधारकांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने ते आपोआप रद्द होतील आणि त्यामुळे प्राप्त झालेल्या इष्टांकानुसार नवीन पात्र लाभार्थ्यांचा योजनेत समावेश करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय-४६ फ मध्ये मंजूर असलेली कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(४६) ११०५३२ (०५-०४-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय-४६ फ मध्ये मंजूर असलेली कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधावाटप कार्यालयात विविध कामाकरिता येणाऱ्या नागरिकांच्या अडचणी दूर व्हाव्यात याकरीता उक्त कार्यालयातील मंजूर असलेली रिक्त पदे तातडीने भरण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत काय निर्णयात्मक कार्यवाही केली सदर कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-०४-२०१८) :** (१), (२) व (३) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय क्र.४६ फ मध्ये विविध संवर्गातील एकूण ३० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १७ पदे भरलेली आहे.

वित्त विभागाच्या दि.२९.६.२०१७ च्या शासन निर्णयानुसार पदांचा आढावा घेण्यात आला असून उक्त आढावा वित्त विभागाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. उक्त आढावा मंजूर झाल्यानंतर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील वृदध साहित्यीक कलावंताना थकीत मानधन देण्याबाबत

**(४७) ११०८३० (०६-०४-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील वृदध साहित्यीक व कलावंत यांचे मानधन ऑक्टोबर, २०१६ पासुन थकित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनीधीनी मा.सामाजिक न्यायमंत्री यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये लेखी निवेदनादवारे विनंती केलेली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अदयापपर्यंत शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील ८१७ कलावंतापैकी ६१० कलावंतांना महिना रुपये श्रेणीनुसार अ-२१०० रु.ब-१८०० रु, व क-१५०० रु. प्रमाणे ऑनलाईन मानधन थेट बँक खात्यात जमा करण्यात येते. उर्वरित २०७ कलावंतांपैकी १८ कलावंताचे बॅक खाते नंबर व आयएफएसी कोड प्राप्त झाल्याने दि. ११ एप्रिल, २०१८ रोजी कलावंताच्या बँक खात्यात थेट ऑनलाईन मानधन जमा करण्यात आलेले आहे. उर्वरित १८९ कलावंत हे मयत असून समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्या स्तरावर वारसदारासंबंधी कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

उमरगा तालुक्यात एकूण ७४ कलावंत असून यापैकी ६८ कलावंतांच्या खात्यात नियमितपणे मानधन जमा करण्यात आलेले आहे. उर्वरित ६ कलावंतांचे बँक खाते तपशील माहे डिसेंबर, १७ मध्ये प्राप्त झाल्याने त्यांच्या खात्यात ऑनलाईन मानधन जमा करण्यात आले आहे.

लोहारा तालुक्यातील एकूण १३ कलावंतापैकी १० कलावंतांचे बँक खाते नंबर व आयएफएसी कोड प्राप्त झाल्याने दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी कलावंतांच्या बँक खात्यात थेट ऑनलाईन मानधन जमा करण्यात आलेले आहेत. उर्वरित ३ कलावंत मयत असून त्यांच्या वारसदार पती/पत्नी यांना मानधन मंजूर करण्याची कार्यवाही जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात निकृष्ट दर्जाचा मका रेशन दुकानदारास खरेदी करण्याबाबत होत असलेली सक्ती

**(४८) १११२१० (२४-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मक्याचे उत्पादन वाढल्याने नाशिक जिल्हयातून ३८ हजार क्विंटल मक्याची खरेदी करण्यात आलेला मका वर्षभरापासून पडून राहिल्याने त्याची गुणवत्ता व दर्जा खराब झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकृष्ट दर्जाचा मका रेशन दुकानदारास खरेदी करण्याची सक्ती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निकृष्ट दर्जाचा मका रेशन दुकानदारास घेण्यास सक्ती करणा-या संबधित दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१८-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यामध्ये खरीप पणन हंगाम २०१६-१७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ३८१३१.८० क्विंटल मक्याचे वाटप माहे डिसेंबर, २०१७ मध्ये अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका ४ किलो व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती १ किलो याप्रमाणे प्रतिकिलो रु.१/- या दराने करण्यात आलेले आहे.

सदर मक्याची गुणवत्ता व दर्जा शासनाने विहित केल्यानुसार असून, सदर मका घेण्यास नकार दिल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## क्रांतिसूर्य ज्योतिराव फुले फोरमनने आपल्या विविध मागण्यासाठी पुणे येथे काढलेली महारॅली

**(४९) १११३९७ (०५-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलींची पहिली शाळा असलेला भिडेवाडा (जि.पुणे) येथे राष्ट्रीय स्मारक करावे, महात्मा ज्योतीबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना संयुक्तरित्या भारतरत्न पुरस्कार द्यावा, म.फुलेंचे समग्र साहित्य पुन्हा प्रकाशित करावे, ओबीसींची जनगणना घोषित करावी या मागण्यांसाठी क्रांतिसूर्य ज्योतिराव फुले फोरमनने पुणे येथे महारॅली काढली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महारॅलीच्या माध्यमातून केलेल्या मागण्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०४-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि फुले दाम्पत्यांना अभिवादन करण्यासाठी व त्यांच्या सन्मानार्थ अखिल भारतीय माळी महासंघ पुणे यांचेमार्फत दि. १ जानेवारी, २०१८ रोजी महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते.
(२) सदर महारॅली भिडेवाडा ते महात्मा फुले वाडा व तेथून पुढे सावित्रीबाई फुले स्मारक, भवानी पेठ, पुणे या ठिकाणी जाऊन विसर्जित झाली. सदर महारॅलीचे आयोजन फुले

दाम्पत्यांना अभिवादन करण्यासाठी व त्यांच्या सन्मानार्थ करण्यात आले असल्यामुळे संयोजकांनी शासनाच्या कोणत्याही विभागास मागण्यांचे निवेदन सादर केलेले नाही. त्यामुळे शासनाकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे तेर, ढोकी, तळवडा व येडशी (जि.उस्मानाबाद) या चार गावांसाठीची पाणी पूरवठा योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत**

**(५०) ११४७३९ (१९-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढोकी, तडवळा, येडशी तेर (जि.उस्मानाबाद) या चार गावांस तेरणा धरणावरुन पाणी पुरवठा करण्याची योजना आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन वर्षात सततचा दुष्काळ असल्याने सदरहू पाणीपुरवठा योजना बंद होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पाणीपुरवठा योजनेची विद्‌युत जोडणी महावितरणाने कायमची बंद केलेली असून बंद काळातील पाणीपुरवठा देयकाची रक्कम आकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर्षी चांगला पाऊस पडल्याने तेरणाधरण भरलेले असल्यामुळे सदरहू पाणीपुरवठा पूर्ववत सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांच्याकड दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१८) :** (१) होय,

(२) होय,

(३) अशंत: खरे आहे,

योजनेचा पाणपुरवठा बंद असताना किमान विद्‌युत आकार आकारण्यात आलेला आहे.

(४) होय,

(५) मजीप्रा, मुंबई, यांच्या नियमाक मंडळाच्या १३० व्या बैठकीतील विषयान्वये म.जी.प्रा मार्फत चालविण्यात येत असलेल्या तोटयातील योजना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा विषय पारीत करण्यात आलेला असून सदर योजना ३ महीने सक्षमपणे म.जी.प्रा. यांनी चालविल्यानंतर सदर योजनेचे हस्तांतरण जिल्हा परिषद स्विकारणार आहे.

सद्य:स्थितीत सदर गावातील ग्रामस्थ विद्युत पंप, हातपंप, आड, जुनी पाणी पुरवठा योजना, व सार्वजनीक विहीरीतून पाण्याची गरज भागवित आहे.

---

| | |
|---|---|
| **विधान भवन :** | **डॉ. अनंत कळसे** |
| **नागपूर.** | **प्रधान सचिव,** |
| | **महाराष्ट्र विधानसभा.** |

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.